बाप्पा मोरया...

मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२३। पान १

# मोशी परिसरात पारंपारिक पध्दतीने विसर्जन मिरवणूकीवर भर!

## नागेश्वर मित्र मंडळाचा सामाजिक कार्याचा आदर्श

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** दहा दिवसांच्या बाप्पांची स्थापना मागील २८ वर्षापासून भक्तीभावाने केली जाते. सामाजिक आणि पर्यावरणावर संदेश देण्याचे काम मंडळाने यापूर्वी केले आहे. यंदा देखाव्यामध्ये फुलांची सजावट, विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दहा दिवस सांस्कृतिक कार्यक्रमांवर भर देण्यात आला आहे. त्यातून प्रोत्साहन देण्यासाठी भरघोस बक्षीस ठेवण्यात आली आहेत. अनंत चतुर्थीच्या दिवशी पारंपारिक संस्कृती जपत पारंपारिक वाद्यांच्या माध्यमातून विसर्जन मिरवणूक काढली जात असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष किरण गायकवाड आणि मंडळाच्या सदस्यांनी दिली. मागील ३५ वर्षापासून सलग गणेशोत्सव साजरा केला जातो. यंदा साध्या पद्धतीने गणेशोत्सव साजरा केला जात आहे. मंगळातील दोन कार्यकर्त्यांचे निधन झाल्यामुळे साध्या पध्दतीने केला जात आहे. भजन आणि मंत्र, आरती यावर भर दिला जातो. मंडळाचे वैशिष्ट्य म्हणजे मागील २८ वर्षापासून सामुदायिक विवाह सोहळे आयोजित करून विविध जाती धर्मातील जोडप्यांचे विवाह लावून दिले आहेत. पोलिस प्रशासनाला सहकार्य करत सातव्या दिवशी पारंपारिक वाद्यांच्या माध्यमातून विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. मंडळाच्या आरतीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भेट दिली. मंडळाचे अध्यक्ष बबन बोराटे आहेत. तर मारूती सस्ते, तुकारम कुटे, राजीव आल्हाट आणि इतर सदस्यांचा सहभाग आहे. सुमारे शंभर सदस्य मंडळामध्ये आहेत.



### सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न

» मंडळाचे १६ वे वर्षे आहे. अनंत चतुर्थीच्या दिवशी पारंपारिक पध्दतीने विसर्जन मिरवणूक केली जाते. दरवर्षी सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न मंडळाच्या माध्यमातून केला जातो. वारकरी सांप्रदाय मोठ्या प्रमाणात असल्याने भजन, प्रवचन, आरती, मंत्र यावर अधिक भर दिला जातो. विसर्जन मिरवणूक पारंपारिक पध्दतीने आणि पोलिस प्रशासनाला सहकार्य करत केली जाते. मंडळाचे एकूण ४० सदस्य उत्कृष्टरित्या नियोजन करत असल्याची माहिती संस्थापक परशुराम आल्हाट आणि अध्यक्ष अणित आल्हाट यांनी दिली.

# पिंपरी चिंचवडमध्ये 'टी-ट्वेंटी क्रिकेट'चा थरार!

## कै. चंद्रकांत साठे यांच्या स्मरणार्थ १७ ते २७ ऑक्टोबर क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनच्या वतीने पिंपरी-चिंचवड परिसरातील संघासाठी दि.१७ ते दि.२७ ऑक्टोबर या कालावधीत खुली, टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धा कै. चंद्रकांत साठे (आंतरराष्ट्रीय क्रिकेट पंच) यांच्या स्मरणार्थ घेण्यात येणार असल्याची माहिती पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष जगदीश शेट्टी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी असोसिएशनचे सचिव राजू कोतवाल, खजिनदार संजय शिंदे, नरेंद्र कदम, प्रदीप वाघ, मनोज कदम आणि डॉक्टर मृदुला महाजन उपस्थित होत्या. पिंपरी-चिंचवड शहरामधील खेळाडूंसाठी क्रीडा नैपुण्य दाखवण्याची ही एक उत्तम संधी आहे. याच स्पर्धेतून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची निवड पिंपरी-चिंचवड प्रीमियर लीगसाठी करण्यात येईल असे स्पर्धेची माहिती देताना जगदीश शेट्टी म्हणाले. तसेच सचिव राजू कोतवाल यांनी माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये आंतरशालेय (मुलांची व मुलींची) १४ व १७ वर्षाखालील गटांकरिता क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले. कै. चंद्रकांत साठे (आंतरराष्ट्रीय क्रिकेट पंच)



स्मरणार्थ टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धा पिंपरी-चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनच्या वतीने पिंपरी-चिंचवड परिसरातील (पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय क्षेत्र) संघासाठी खुली, टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धा कै. चंद्रकांत साठे यांच्या स्मरणार्थ घेण्यात येणार आहे. सदर स्पर्धा दि.१७ ऑक्टोबर ते दि.२७ ऑक्टोबर २०२३ च्या दरम्यान सिल्वर क्रिकेट मैदान, चिखली व परंदवाल क्रिकेट मैदान,देहू येथे होणार आहे. ही स्पर्धा गुलाबी चेंडूवर व बाद पद्धतीने खेळली जाणार आहे. एकूण ३२ संघांचा समावेश या स्पर्धेत असेल. प्रत्येक संघामध्ये १५ खेळाडू असतील. सर्व संघाचा गणवेश पांढरा असावा. या स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क रुपये १०,०००/- असून संघाची नोंदणी करण्याची शेवटची तारीख ५ ऑक्टोबर २०२३ आहे. या स्पर्धेत संघाची नोंदणी करताना खेळाडूंची ओळखपत्रे, रहिवासी दाखला म्हणून पाहिली जातील. खेळाडू किमान तीन वर्ष पिंपरी-चिंचवड परिसराचा रहिवासी असावा.

# शहरात संसर्गजन्य रुग्णांचे प्रमाण वाढले!

## उपाययोजना करा; दीपक मोढवे-पाटील यांचे आयुक्तांना निवेदन

**मोशी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड संसर्गजन्य आजाराचे वाढते रुग्ण पाहता महापालिका दवाखान्यांत स्वतंत्र यंत्रणा आणि उपाययोजना कराव्यात. नागरी आरोग्याला प्राधान्य द्यावे, अशी मागणी भाजपा वाहतूक आघाडीचे शहराध्यक्ष दीपक मोढवे-पाटील यांनी केली आहे. याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिकेसह राज्यभरात संसर्गजन्य आजाराच्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. सर्दी, ताप, खोकला आदींसारख्या त्रासाने रुग्ण त्रस्त आहेत.



नुकतेच कोरोना सारख्या महामारीतून जग सावरत आहे. शासनाने योग्य खबरदारी घेतल्यामुळेच या महामारीचा सामना करता आला. त्या पद्धतीची खबरदारी शासनाकडून सध्या अपेक्षीत आहे. राज्यात कोरोनाच्या आजाराचे वेगवेगळे प्रकार समोर येत आहेत. यासह संसर्गजन्य आजाराचे रुग्ण असलेले प्रमाण देखील वाढत आहे. मध्यंतरी डोळ्यांची साथ आली होती. शहरातील मासुळकर कॉलनी येथे रुग्ण गर्दी करत आहेत. या आजारांना आळा घालायचे असल्यास वैद्यकीय योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे. शहरातील मोठी रुग्णालये तसेच दवाखान्यात उपचारासाठी रुग्ण मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत. रुग्णांची संख्या पाहता शासकीय यंत्रणा देखील तोकड्या पडत आहेत. त्याचा परिणाम रुग्ण सेवेवर होत आहे. ही यंत्रणा वाढविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असेही दीपक मोढवे-पाटील यांनी म्हटले आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेची मोठी आठ रुग्णालये आहेत. या बरोबरच प्रभागात अनेक ठिकाणी दवाखाने देखील आहेत. दवाखान्यात अधिकच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. तसेच सर्दी, ताप, खोकला आदी सारख्या संसर्गजन्य आजारांच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी स्वतंत्र आरोग्य कॅम्प राबवावा. त्यामुळे रुग्णालयात येणाऱ्या इतर रुग्णांना त्याचा त्रास होणार नाही. तसेच या आजाराच्या रुग्णांवर योग्य उपचार होऊन त्याचा त्यांना फायदा होईल. याबाबत त्वरित कार्यवाही करावी, अशी आग्रही मागणीही दीपक मोढवे-पाटील यांनी केली आहे.

### शहरात ठिकठिकाणी कॅम्प राबवा

» राज्यात कोरोनाच्या आजाराचे वेगवेगळे प्रकार समोर येत आहेत. यासह संसर्गजन्य आजाराचे रुग्ण असलेले प्रमाण देखील वाढत आहे. मध्यंतरी डोळ्यांची साथ आली होती. शहरातील मासुळकर कॉलनी येथे रुग्ण गर्दी करत आहेत. या आजारांना आळा घालायचे असल्यास वैद्यकीय योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे. शहरातील मोठी रुग्णालये तसेच दवाखान्यात उपचारासाठी रुग्ण मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत. रुग्णांची संख्या पाहता शासकीय यंत्रणा देखील तोकड्या पडत आहेत.

# गणेश विसर्जन मार्गावरील अडथळे; अतिक्रमणे दूर करा!

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या जनसंवाद सभेत नागरिकांच्या तक्रारी

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार सर्व क्षेत्रिय कार्यालयांत करण्यात येते. सभेचे अध्यक्ष तथा मुख्य समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेल्या मनपा क्षेत्रीय कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांना महापालिकेच्या अनुषंगाने असलेली कामे, अडचणी, तक्रारी, सूचना या सर्व बाबींची नोंद घेऊन संबधितांना या बाबतीत कार्यवाही करण्याच्या सूचना महापालिकेकडून दिल्या गेल्या आहेत. महापालिकेच्या क्षेत्रिय कार्यालयांमध्ये आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी सहभाग घेऊन



एकूण ३५ तक्रारवजा सूचना मांडल्या. यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये अनुक्रमे १०, ४, ५, १, ४, ३, २ आणि ६ तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या. अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे अध्यक्षपद मुख्य समन्वय अधिकारी असलेले अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, सहशहर अभियंता श्रीकांत सवणे, मनोज सेठीया, संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, अजय चारठाणकर यांनी भूषवले. तसेच यावेळी क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित, आण्णा बोदडे, किरण मोरे, राजेश आगळे, सिताराम बहुरे, शितल वाकडे, उमेश ढाकणे उपस्थित होते. आज पार पडलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी विविध तक्रारी व सूचना मांडल्या. यामध्ये मुख्यत्वे नुकत्याच झालेल्या पावसाचे पाणी रस्त्यावर साचले होते, भविष्यात अशी समस्या पुन्हा उद्भवू नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी आणि अनंत चतुर्दशीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या श्रीगणेश विसर्जनासाठी विसर्जन मार्गावरील रस्त्यावरील अडथळे तसेच अतिक्रमणे दूर करावीत अशा सूचनांचा प्रामुख्याने समावेश होता. तसेच रस्ते आणि ड्रेनेज लाईन्स दुरूस्त कराव्यात, पाणीपुरवठा योग्य दाबाने करावा, शहरात वाढणाऱ्या रहदारीचे योग्य नियोजन करावे या सूचनाही नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या. नागरिकांशी सुसंवाद साधणे, तक्रारींचे निराकरण करणे आणि प्रशासकीय निर्णयांमध्ये तसेच होणाऱ्या विकासकामां मध्ये नागरिकांच्या समस्या दूर व्हाव्यात यासाठी क्षेत्रिय कार्यालयनिहाय जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येत असते. या सभेकरीता महानगरपालिकेच्या आठ क्षेत्रीय कार्यालयांसाठी क्षेत्रीय कार्यालय निहाय मुख्य समन्वय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत.

### पाणीपुरवठा योग्य दाबाने करावा

» जनसंवाद सभेत नागरिकांनी विविध तक्रारी व सूचना मांडल्या. यामध्ये मुख्यत्वे नुकत्याच झालेल्या पावसाचे पाणी रस्त्यावर साचले होते, भविष्यात अशी समस्या पुन्हा उद्भवू नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी आणि अनंत चतुर्दशीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या श्रीगणेश विसर्जनासाठी विसर्जन मार्गावरील रस्त्यावरील अडथळे तसेच अतिक्रमणे दूर करावीत अशा सूचनांचा प्रामुख्याने समावेश होता. तसेच रस्ते आणि ड्रेनेज लाईन्स दुरुस्त कराव्यात, पाणीपुरवठा योग्य दाबाने करावा, शहरात वाढणाऱ्या रहदारीचे योग्य नियोजन करावे या सूचनाही नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.

# खडकवासला-फुरसुंगी कालव्याऐवजी बोगदा!

## कालव्याच्या जागेवर पर्यायी रस्त्याची चाचपणीस सुरुवात

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** खडकवासला ते फुरसुंगी या दरम्यान कालव्याऐवजी बोगदा प्रस्तावित करण्यात आला असून, कालव्याच्या जागेवर पर्यायी रस्त्याची चाचपणी करण्यास सुरुवात झाली आहे. कालव्याच्या जागेचा वापर रस्ता, उड्डाणपूल किंवा मेट्रो मार्गिका यांपैकी कोणत्या कामासाठी उपयुक्त राहील, याचा अभ्यास करण्याची सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे. खडकवासला ते फुरसुंगी बोगदा प्रकल्पाचे २२०० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. हा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनस्तरावर दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दोन



दिवसांपूर्वी मुंबईत बैठक घेतली. महापालिका आणि जलसंपदा विभागाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. त्यावेळी कालव्याच्या जागेचा वापर कशासाठी करता येईल, यासंदर्भात चर्चा करण्यात आली. त्याबाबतचा अहवाल अभ्यास करून सादर करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी दिली. अहवालानंतर त्याबाबतचा अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. धरणातील पाण्याचे बाष्पीभवन, उन्हाळी आवर्तनामुळे आणि गळतीमुळे सुमारे २.८ अब्ज घनफूट पाणी वाया जाते. म्हणजे सुमारे ६ कोटी १७ लाख ३० हजार ७२५ लीटर पाणी वाया जाते. म्हणजेच शहराला दोन महिने पुरेल एवढे हे पाणी आहे. त्यामुळे खडकवासला धरण ते फुरसुंगी दरम्यान बोगद्यातून पाणी नेल्यास या पाण्यात बचत होऊ शकते. या पार्श्वभूमीवर हा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे. जलप्रदूषण रोखण्याबरोबरच आहे, त्या पाणीसाठ्यात बचत करणाऱ्या खडकवासला धरण ते फुरसुंगी दरम्यान प्रस्तावित असलेल्या २८ किलोमीटर लांबीचा बोगद्याच्या (बंद कालवा) अहवालास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडून (स्टेट लेव्हल टेक्निकल ॲडव्हायजरी कमिटी – एसएलटीए) राज्य सरकारकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे. या प्रकल्पातून दोन ते अडीच टीएमसी पाणी वाचणार आहे.

### कालव्याची वहन क्षमता वाढेल

» ७.८० मीटर रूंद, ३.९० मीटर उंच आणि १.९५० मीटर गोलाकार उंची अशा 'डी' आकाराच्या बोगद्यातून खडकवासला ते फुरसुंगी दरम्यान बंदिस्त जलवाहिनीतून पाणी नेण्याचे जलसंपदा विभागाकडून निश्चित करण्यात आले आहे. यामुळे कालव्याची क्षमता १५१० क्युसेक होणार असून, ते सर्व पाणी गुरुत्वाकर्षण शक्तीने फुरसुंगीपर्यंत नेण्यात येणार आहे. त्यामुळे पाण्याचे प्रदूषण, गळती आणि बाष्पीभवन रोखण्यास मदत होऊन अडीच टीएमसी पाणी वाचणार आहे.

# जेजुरीच्या खंडोबा गडाला प्राप्त होणार ऐतिहासिक वैभव!

## विकास आराखड्यातील कामे दोन वर्षात पुरी करण्याचे नियोजन

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या खंडोबा गडावर शासनाच्या पुरातत्व खात्याकडून गड व मंदिर दुरुस्तीचे काम वेगात सुरू असून मराठेशाहीच्या थोर इतिहासाची साक्ष देणाऱ्या या गडाला पुन्हा ऐतिहासिक वैभव प्राप्त होणार आहे. कामे पूर्ण झाल्यानंतर देवा तुझी सोन्याची जेजुरी या उक्तीप्रमाणे खंडोबा गडाला सोन्याची झळाळी येणार आहे.येथे येणाऱ्या भाविक व पर्यटकांना गडाचे प्राचीन वैभव पाहायला मिळणार आहे. महाराष्ट्र शासनाने तीर्थक्षेत्र जेजुरी विकास आराखड्यासाठी ३४९ कोटी ४५ लाख रुपये २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात मंजूर केले आहेत.त्यातील पहिल्या टप्प्यातील १०९ कोटी ५७ लाख ९६ हजार खर्चाच्या कामास सुरुवात झाली आहे.



जेजुरीचा खंडोबा अठरापगड जातीचे कुलदैवत असून २५० वर्षानंतर प्रथमच शासनाने खंडोबा गडाच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून दिल्याने ग्रामस्थ भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. काळाच्या ओघात गडामधे सिमेंट काँक्रीटची बांधकामे झाली,जुन्या दगडी भिंतींना रंग देण्यात आले,संगमरवरी फरशा घालण्यात आल्या, हे सर्व काढून खंडोबा गडाला पुन्हा मूळ स्वरूप दिले जाणार आहे. पावसाचे पाणी मुरल्यामुळे अनेक ठिकाणी दगडांची झीज झाली,अनेक आकर्षक दीपमाळा पडून नष्ट झाल्या, मात्र आता महाराष्ट्र शासनानेच पुरेसा निधी उपलब्ध करून दिल्याने गडाचे योग्य पद्धतीने संवर्धन व सुशोभीकरण होणार आहे. ७ ऑगस्ट रोजी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,अजित पवार यांच्या उपस्थितीत गडावरील विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला. पुण्याचे जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली हे सर्व काम होत असून यासाठी पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात आली आहे.पुरातत्व खात्याच्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कामे होत आहेत. गडाची दगडी तटबंदी,आतील ओवऱ्या यांची शास्त्रीय पद्धतीने स्वच्छता करून चुन्याने दर्जा भरल्या जात आहेत.पूर्वीच्या काळी दगडी बांधकामाला चुन्यामध्ये विविध पदार्थ मिसळून तो चुना वापरला जायचा तसेच मिश्रण तयार करून गडाचे मजबुतीकरण केले जात आहे.मुख्य मंदिरामधील संगमरवरी फरशा काढून दगडी फरशा बसविल्या जाणार आहेत.संपूर्ण गड व परिसराची शास्त्रीय पद्धतीने डागडुजी होत असल्याने खंडोबा गडाचे आयुष्यमान वाढणार आहे.पहिल्या टप्प्यातील कामासाठी ५० कारागीर दिवस-रात्र काम करीत आहेत. दोन वर्षात जेजुरी विकास आराखड्यातील कामे पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जेजुरीचा खंडोबा हे मराठीशाहीचं कुलदैवत असून छत्रपती शिवराय आणि शहाजीराजे यांची गडावर भेट झाल्याचा उल्लेख आहे. मूळ खंडोबा मंदिर प्राचीन असून गडाच्या परिसरातील तटबंदी दीपमाळा याचे बांधकाम १५११ ते १७८५ मध्ये झालेले आहे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,मल्हारराव होळकर, तुकोजी होळकर, यांनी गडाच्या तटबंदीचे काळ्या पाषाणात बांधकाम केले. राघो मंबाजी, विठ्ठल शिवदेव यांनी गडामध्ये बांधकामे केली, खंडोबा गडाची उंची पायथ्यापासून ८०२ मीटर असून बांधकाम काळ्या पाषाणातील आहे,गडाच्या परिसरात ३५० दीपमाळा होत्या, त्यातील आता १४२ अस्तित्वात आहेत. पेशवाईच्या काळात सोनोरीचे सरदार रामराव व महिपतराव पानसे यांनी अर्पण केलेला शुद्ध पोलादाचा खंडा (तलवार ) गडावर आहे.

### आराखड्यातील कामे पूर्ण करणार

» जेजुरी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामे दोन वर्षात पुरी करण्याचे नियोजन आहे. खंडोबा गडाचे योग्य प्रकारे संवर्धन होण्यासाठी कामे सुरू झाली आहेत. खंडोबा गडामध्ये १५ ऑक्टोबर रोजी घटस्थापना होत आहे. तोपर्यंत मुख्य मंदिराच्या गाभाऱ्याचे काम पूर्ण केले जाणार आहे. गडावर देवदर्शनास येणाऱ्या ग्रामस्थ, भाविकांनी सहकार्य करावे.

# ढोल ताशांच्या गजरात वर्ल्डकप रॅलीचं स्वागत!

## ज्येष्ठ क्रिकेटपटू चंदू बोर्डे, क्रिकेटपटू केदार जाधव सहभागी




**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
आयसीसी वर्ल्ड कप स्पर्धा ५ ऑक्टोबरपासून सुरू होते आहे. वर्ल्ड कप कोण जिंकणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले असताना आज महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांनी विश्वचषकाचे पुण्यात अनावरण केले. त्यानंतर सेनापती बापट रोड येथून विश्वचषकासोबत भव्य अशी रॅली काढण्यात आली. या रॅलीत ज्येष्ठ क्रिकेटपटू चंदू बोर्डे, क्रिकेटपटू केदार जाधव यांच्यासह आजी माजी पदाधिकारी, विविध शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले आहेत. सेनापती बापट रोड ते शेतकी महाविद्यालया दरम्यान रॅली काढण्यात आली. या रॅलीचे हजारो पुणेकर नागरिकांनी ठिकठिकाणी ढोल ताशांच्या गजरात स्वागत केले. 'तर जितेगा भाई जितेगा इंडिया जितेगा' आणि 'भारत माता की जय' हा एकच जयघोष पाहण्यास मिळाला. यावेळी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आमदार रोहित पवार म्हणाले की, यंदाच्या वर्ल्ड कप स्पर्धेला ५ ऑक्टोबरपासून सुरुवात होत आहे. तसेच आपल्या देशात वर्ल्ड कप स्पर्धा आयोजित करण्यात आली असून त्याबद्दल विशेष आनंद होत आहे. गहुंजे येथील स्टेडियम येथे पाच सामने होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन मार्फत सर्व तयारी करण्यात आली आहे. पुण्यासह जगभरातील क्रिडा प्रेमी गहुंजे स्टेडियम येथे होणार्या सामन्यांना मोठ्या संख्येने हजेरी लावतील, असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. आज पुण्यातील सेनापती बापट रोड तेथून फर्ग्युसन महाविद्यालय मार्गे शेतकी महाविद्यालय दरम्यान वर्ल्डकप रॅलीचं आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली शेतकी महाविद्यालय येथे समाप्त होणार असून त्या ठिकाणी पुणेकर नागरिकांसाठी वर्ल्डकप पाहण्यासाठी ठेवला जाणार आहे. तसेच त्यावेळी नागरिकांना वर्ल्ड कप सेल्फी काढण्याची संधीदेखील मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### भारत माता की जयचा जयघोष

» या रॅलीत ज्येष्ठ क्रिकेटपटू चंदू बोर्डे, क्रिकेटपटू केदार जाधव यांच्यासह आजी माजी पदाधिकारी, विविध शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले आहेत. सेनापती बापट रोड ते शेतकी महाविद्यालयादरम्यान रॅली काढण्यात आली. या रॅलीचे हजारो पुणेकर नागरिकांनी ठिकठिकाणी ढोल ताशांच्या गजरात स्वागत केले. 'तर जितेगा भाई जितेगा इंडिया जितेगा' आणि 'भारत माता की जय' हा एकच जयघोष पाहण्यास मिळाला. यावेळी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष आमदार रोहित पवार म्हणाले की, यंदाच्या वर्ल्ड कप स्पर्धेला ५ ऑक्टोबरपासून सुरुवात होत आहे.

# माळेगाव कारखान्याने १० गावे जोडण्याचा निर्णय केला रद्द!

## माळेगावचे १० लाख टनापेक्षा अधिकचे ऊस गाळपाचे उद्दिष्ट पुर्णत्वाला जाईल



**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
सोमेश्वर साखर कारखान्याच्या हद्दीतील १० गावे माळेगावच्या कार्यक्षेत्राला जोडण्याचा महत्वपुर्ण विषय आज अधिकृतरित्या अध्यक्ष ॲड. केशवराव जगताप यांच्या संचालक मंडळाने रद्द केला. तसेच ड्राफ प्रोसडिंगमध्येही सदरचा विषय नामंजूर झाल्याची दुरूस्ती केली जाणार असल्याचे संचालकांनी जाहिर केले. विशेषता नव्याने अध्यक्ष पदाचे सूत्र स्वीकारल्यानंतर जगताप यांनी हा महत्वपूर्ण घेतलेल्या निर्णयाचे सभासदांनी स्वागत केले. ''ऊस टंचाईच्या प्रतिकूल स्थितीत आगामी गळीत हंगामात ऊस मिळविण्यासाठी वरील धोरणात्मक निर्णयाचा कोणताही परिणाम होणार नाही. अधिकचा ऊस दर देण्याची परंपरा असल्याने गेटकेनधारकांचा माळेगाववर विश्वास आहे. त्यामुळे यंदा माळेगावचे १० लाख टनापेक्षा अधिकचे ऊस गाळपाचे उद्दिष्ट पुर्णत्वाला जाईल. त्यासाठी माजी अध्यक्ष बाळासाहेब तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळ शर्थीचे प्रयत्न करेल'', अशा विश्वास अध्यक्ष केशवराव जगताप, उपाध्यक्ष तानाजी देवकाते यांनी यावेळी व्यक्त केला. माळेगाव सहकारी साखर कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी ३० सप्टेंबर रोजी होणार आहे. त्या पार्श्वभूमिवर प्रशासनाने सभासदांना मागिल सभेचे ड्राफ प्रोसडिंग पाठविले होते. त्या प्रोसडिंगमध्ये सोमेश्वरच्या हद्दीमधील १० गावे माळेगावला जोडण्याचा विषय बहुमताने मंजूर झाल्याचा उल्लेख केला होता. प्रशासनाच्या या भूमिकेविरुद्ध विरोधक चंद्रराव तावरे, रंजन तावरे यांनी अक्षेप घेतला होता. तसेच त्यांनी गतवर्षीचा अंतिम दर, विस्तारिकरण होत असलेला डिस्टलरी प्रकल्पावर सत्ताधारी संचालक मंडळावर टिकेची झोड उठविली होती. त्या पार्श्वभूमिवर अध्यक्ष केशवराव जगताप, उपाध्यक्ष तानाजी देवकाते, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब तावरे आदी संचालकांनी विरोधकांच्या आरोपांना मंगळवारी पत्रकार परिषदेत सडेतोड उत्तरे दिली. अध्यक्ष श्री. जगताप म्हणाले, 'कमी खर्चात अधिक गाळप केल्यास सभासदांना राज्यात सर्वाधिक ३४११ रुपये ऊस दर देता येतो. हे चित्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली माळेगावने दाखवून दिले. माळेगावचे उसाचे कार्यक्षेत्र मुळातच मर्यादित आहे. त्यात कारखान्याचे विस्तारिकण झाले. गळीतचे उद्दिष्ट पुर्ण करण्यासाठी जवळचे उसाचे कार्यक्षेत्र वाढले पाहिजे, त्यातून सोमेश्वरची १० गावे घेण्याचा विषय पुढे आला होता. परंतु सभासदांच्या मागणीनुसार संचालक मंडळाने हा विषय अधिकृतरित्या रद्द केला. तसे ड्राफ प्रोसडिंग दुरूस्त केले जाईल.' विरोधकांच्या कारकिर्दीमध्ये सन २०१६-१७ ला सरासरी साखर विक्री ३४२१ रुपये झाली होती, त्यावेळी सभासदांना निच्चांकी असा २९०० रुपये प्रतिटन दर मिळाल्याची नोंद आहे. याकडे लक्ष वेधत संचालक अनिल तावरे यांनी माळेगावने गतवर्षीच्या उसाला सर्वाधिक ३४११ रुपये दर दिल्याचे निदर्शास आणले. कारखान्याची गळीत क्षमता व भविष्यात बगॅससारख्या कच्च्या मालाची उपलब्धता विचारा घेवून इथेनॉल प्रकल्पाचे विस्तारिकरण करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे विरोधकांची पाच लाख लिटर क्षमतेची मागणी संयुक्तिक नाही, अशी माहिती संचालक योगेश जगताप, नितीन सातव यांनी व्यक्त केली.

### अजितदादा सहाकारचेही पुरस्कर्ते

» माळेगाव, सोमेश्वर हे सहकारातील कारखाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहेत. गतवर्षीच्या ऊसाला माळेगावने ३४११, तर सोमेश्वरने ३३५० इतका राज्यात प्रथम क्रमांचा उस दर दिला. अजितदादा हे सहकाराचे पुरस्कर्ते आहेत, हेच या मधून सिद्ध होते. त्यामुळे अजितदादांची धोरणं सहकाराच्या विरोधात आहेत,या विरोधकांच्या आरोपात कितपत तथ्य आहे हे सभासद जाणून आहेत, अशी भूमिका मांडत संचालक योगेश जगताप, सचिन सातव, अनिल तावरे आदींनी विरोधकांचे मुद्दे खोडून काढले.